**<u>महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत सर्व जिल्हयातील ग्रामरोजगार सेवकांना वेळेत मानधन अदा करण्यासाठी मार्गदर्शक सूचना.</u>**

**आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण**
**रोजगारहमी योजना-महाराष्ट्र, नागपूर**
**क्रंमाक :मगांराग्रारोहयोपंचायत/ग्रारोसेमानधन/२०१८/ 798 /**
**दिनांक: 28 मे २०१८**

## -परिपत्रक -

**वाचा** : १) शासन निर्णय क्रमांक -मग्रारोहयो-२०११/प्रक्र४८/रोहयो-१० दि.०१ मार्च २०१४
२) शासन परिपत्रक क्रमांक -मग्रारोहयो-२०१/प्रक्र४८/रोहयो-१० दि.०४ मार्च २०१४

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतंर्गत ग्रामसेवकाला मदत करण्यासाठी ग्रामरोजगार सेवकांची नियुक्ती ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येते. ग्रामरोजगार सेवकास अकुशल मजूरीप्रदानाच्या खर्चाच्या रकमेनुसार वरील वाचा मधील शासन निर्णय व परिपत्रकानुसार मानधन अदा करण्याबाबत निर्देश आहेत. ग्रामरोजगार सेवकांना त्यांचे मानधन वेळेवर मिळण्यासाठी त्याची अचूक परिगणना करणे आवश्यक आहे.

याबाबत शासन निर्णय क्र.मग्रारो२०११/प्र.क्र.४८/रोहयो१० दिनांक ०१ मार्च २०१४नुसार सुधारित मानधनाचा दर निश्चित करण्यात आलेला आहे. काही जिल्हयांना दिलेल्या भेटी दरम्यान ग्रामरोजगार सेवकांच्या मानधनाची अचूकपणे परिगणना होत नसुन निर्मीत मनुष्य दिवसांची गणना करतांना दुरुक्ती होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. या पार्श्वभूमीवरआपल्या सोईसाठी Excell Calculater तयार करण्यात आलेले असून त्याच्या वापरासंबंधी खालील प्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करण्याबाबात निर्देश संदर्भ क्रमांक १ मधील परिपत्रकाच्या परिच्छेद ०४ नुसार देण्यात येत आहेत.

१) दरमहा १५ तारखेपर्यंत पुर्वीच्या महिन्याचे ग्रामरोजगार सेवकांचे मानधन अदा करण्यात यावे..

२) आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासून निर्माण झालेल्या प्रथम १००० मनुष्यदिवस निर्मीतीच्या अनुषंगाने एकूण मजूरी प्रदानाच्या ६ टक्के प्रमाणे ग्रामरोजगार सेवकांचे मानधन Excell Calculater व्दारे निश्चत करुन अदा करण्यात यावे.

३) १००० मनुष्यदिवसाच्या नंतर निर्माण होणा-या २००० दिवसापर्यंतच्या (2000-1000=1000) मनुष्यदिवसाच्या अनुषंगाने एकूण मजूरी प्रदानाच्या ४ टक्के प्रमाणे मानधन Excell Calculater व्दारे निश्चित करुन ग्रामरोजगार सेवकांस अदा करण्यात यावे.

४) २००० मनुष्यदिवसानंतर निर्माण होणा-या सर्व मनुष्य दिवसांच्या अनुषंगाने एकूण मजूरी प्रदानाच्या २.२५ टक्के Excell Calculater प्रमाणे मानधन निश्चित करुन अदा करावे.

५) कोणत्याही परिस्थितीमध्ये पुर्वीच्या महिन्यातील निर्मीत मनुष्यदिवस हे नंतरच्या महिन्यातील मनुष्यदिवस परिगणनेमध्ये समाविष्ट होणार नाहीत याबाबत दक्षता घ्यावी.

६) Excell Calculater मध्ये भरण्याची माहिती एमआयएस रिपोर्ट आर ७.१.२ या वरुन घेण्यात यावी स्तंभ क्रमांक ३ व ४ मध्ये संबधित ग्रमापंचायतीच्या भरलेल्या माहितीच्या अनुषंगाने निर्मीत मुनष्य दिवस व सरासरी मजूरीदर यावरुन ग्रामरोजगार सेवकांचे मानधनाचे Excell Calculater व्दारे परिगणना करण्यात येईल स्तंभ क्र.१२ मध्ये त्या आर्थिक वर्षामध्ये निर्मीत मनुष्यदिवसाच्या अनुषंगाने ग्रामरोजगार सेवकाला प्रदान केलेल्या मानधनाची रक्कम अचूकपणे भरणे आवश्यक आहे. त्यानंतरच स्तंभ क्रमांक १३ मध्ये ग्रामरोजगार सेवकाला देय असलेल्या मानधनाच्या रककमेची परिगणना हाईल.

७) ग्रामरोजगार सेवकाचे मानधन अदा करण्यासाठी मनुष्यदिवसाची संख्या ही प्रत्येक आर्थीक वर्षासाठी ०१ एप्रिल या तारखेपासून निर्माण होणा-या मनुष्ययदिवसाची घेण्यात यावी. निर्माण होणा-या मनुष्यदिवसाच्या हिशेब ३१ मार्च पर्यंतचा ०१ एप्रिल नंतरचा असा निश्चित करण्यात यावा. त्याचप्रमाणे यापूर्वी अदा करण्यात आलेल्या मानधनाची रक्कम निश्चित करतांना स्वतंत्र आर्थिक वर्षानुसार निश्चित करण्यात यावी

८) ग्रामरोजगार सेवकांच्या मानधनाची अचूक परिगणना करण्यासाठी Excell Calculater चा वापर करण्याची जबाबदारी ही पंचायत समितीच्या सहायक लेखाधिकारी यांचेवर सोपविण्यात येत आहे.

उपरोक्त पध्दतीने ग्रामरोजगार सेवकांचे मानधन दरमहा निश्चित करावे. यापूढे ग्राम रोजगार सेवकांचे मानधन विलंबाने होणार नाही व मनुष्यदिवसांची गणना करतांना दुरुक्ती होणार नाही याची काळजी घ्यावी.

उपरोक्त सुचनांची अंमलबजावणी व Excell Calculater चा वापर न करता ग्रामरोजगार सेवकांचे मानधन चुकीची परिगणना करुन अदा करण्यात आल्यास संबधित पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व सहायक लेखा अधिकारी यांचेवर होणा-या आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येईल. या परिपत्रकाची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी.

(ए.एस.आर.नायक, भाप्रसे)
आयुक्त
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण
रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर

प्रत: १) मा.सचिव (रोहयो) मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
2) विभागीय आयुक्त (सर्व) यांना माहितीस्तव सादर
३) जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहितीस्तव सादर
४) मुख्य कायकरी अधिकारी (सर्व) यांना माहितीस्तव तथा उचित कार्यवाहीस्तव
५) संबधित नस्ती.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र**

**अंतर्गत ग्रामपंचायत निहाय कार्यरत ग्राम रोजगार सेवक यांच्या मानधनाबाबतचे प्रपत्र**

| अ.क्र | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव | ग्रामरोजगार सेवकाचे नांव | ग्रामपंचायतीव्दारे निर्मीत झालेले मनुष्यदिन | शासन परिपत्रक क्र.मग्रारोहयो - २०१०/प्रक्र४८ /रोहयो-१० दि.४ मार्च २०१४ अन्वये दयावयाचे मानधन | अहवाल महिन्यापर्यत पर्यत देण्यात आलेले मानधन | देय असलेले मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत/रोहयो)

जिल्हा परिषद ---------